**मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत मत्स्यव्यवसाय विकासाच्या योजनांसाठी निधी वितरित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-२४०९/प्र.क्र.१५३/पदुम-१३**
**मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २ डिसेंबर, २००९.**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय कृषी व पदुम विभाग, क्रमांकः मत्स्यवि २४०७/ प्र.क्र. १९२/पदुम-१३ दि.१५.१.२००८.
२) शासन निर्णय कृषी व पदुम विभाग, क्रमांकः मत्स्यवि २४०८/ प्र.क्र. १४२/पदुम-१३ दि.१५.९.२००८.
३) शासन निर्णय कृषी व पदुम विभाग, क्रमांकः मत्स्यवि २४०९/ प्र.क्र. १५३/पदुम-१३ दि.९.११.२००९

**प्रस्तावनाः-**

मराठवाडा विभागातील मत्स्यव्यवसाय विकासासाठी मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण, मत्स्यबीज संचयन, झिंगाबीज संचयन, मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरण, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देणे आदि योजना सन २००८-०९ व २००९-१० या दोन आर्थिक वर्षात राबविण्यास उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय, दिनांक १५.१.२००८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच ही योजना सन २००९-१० या वर्षात राबविण्याकरिता उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय, मत्स्यवि-२४०९/प्र.क्र.१५३/पदुम-१३, दिनांक ९.११.२००९ मान्यता देण्यात आली आहे.

| **अ.क्र** | **योजनेचे नाव** | **तरतूद** | **लेखाशिर्ष** |
|---|---|---|---|
| १ | मत्सयबीज केंद्राचे बळकटीकरणः | रु.४६.३० लाख | ४४०५- मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च,१०१ केंद्र भूजल मत्स्यव्यवसाय,(०२) (०१) मत्स्यबीज केंद्र मोठी/ लहान बांधकामे (४४०५ ००१४) |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मत्स्यबीज संचयन | रु७५.०० लक्ष | २४०५- मत्स्यव्यवसाय,१०१, भूजल मत्स्यव्यवसाय (०२) (०२) अवरुध्द पाण्यात मत्स्य संवर्धन, राज्य योजनांतर्गत योजना २१- सामुग्री पुरवठा, (२४०५०१३७) |
| ३. | डिंगाबीज संचयन | रु.४०.०० लक्ष | २४०५-मत्स्यव्यवसाय, १०१-भूजल मत्स्यव्यवसाय,(०२) (०२) - अवरुध्द पाण्यात मत्स्यसंवर्धन, राज्य योजनांतर्गत योजना, २१-सामग्री व पुरवठा (२४०५०१३७) |
| ४. | मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरण | रु.८०.०० लक्ष | ४४०५- मत्स्यव्यवसाय वरील भांडवली खर्च (००) (१९१) मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१) (०१) व्यवस्थापकीय सहाय्य, ३३ अर्थसहाय्य (४४०५ ०१२१) |
| ५. | मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतूक सुविधा | रु.६१.०० लक्ष | (२४०५) मत्स्यव्यवसाय, १२०- मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, (०२) (०४) मासळीचे सुरक्षण, वाहतूक व विक्री, ३३-अर्थसहाय्य, (२४०५ ०३७१) |
| | **एकूण** | **रु.६६२.३० लक्ष** | |

मराठवाडा पॅकेजच्या अमंलबजावणीसंदर्भात उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दि.९.११.२००९ नुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३४१/०९ अर्थ-१५, दि.२५.११.२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९१२०४१५१७२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प.श.अहमद),
उपसचिव, महाराष्ट्र शासन,

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव

मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव/मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव

आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)

प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, औरंगाबाद

विभागीय आयुक्त, औरंगाबाद, लातूर

मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर

जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र २, नागपूर

जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२/वित्त विभाग, मंत्रालय-३२

अवर सचिव, पदुम-१६, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय.

निवड नस्ती.